# “डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना शिष्यवृत्ती योजना”

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी – मराठा व मराठा – कुणबी या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ.पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन 2022-23 पासून लागू करण्यात आली आहे. शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक 08 नोव्हेंबर, 2017 च्या शासन निर्णयानुसार परिशिष्ठ ब मधील 200 शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित मराठा, कुणबी, कुणबी – मराठा, व मराठा-कुणबी या समाजातील विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदरची योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत “डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना” या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राबविण्यात येत आहे.

- **योजनेचे नांव** :- सारथी संस्थेच्या लक्षित गटातील मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी “डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना”

- **योजनेचा उद्देश** :- मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या जातीतील मुला-मुलींना परदेशात पदवी व पदव्युत्तर पदवी अध्ययन करण्यासाठी आर्थिक मदत देणे.

- **योजनेची व्याप्ती** :- विद्यार्थ्यांना या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-"ब" नुसार देशातील भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या http://mhrd.gov.in/institutions या संकेतस्थळा वरील मान्यता प्राप्त AIIMS, IIM, IIT, IIITS, NIT, IISC & IISER, Institution of National Importance & Other Colleges या नामांकित संस्थामधील पदवी/ पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका (आय.आय.टी. मधील प्रिपरेटरी कोर्स वगळून) पुर्णवेळ अभ्यासक्रमांसाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना लागू राहील.

- **वयोमर्यादा :-** पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची कमाल वयोमर्यादा 25 वर्षे व पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी कमाल वयोमर्यादा 30 वर्षे इतकी राहील.

- **सर्वसाधारण अटी व शर्ती** :- १) या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीचा (नवबौध्दासहित) व महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असावा.

(2) विद्यार्थ्यांने पदवी अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना पदवीसाठी राज्य शासनाच्या किंवा इतर राज्याच्या/केंद्र शासनाच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा. तसेच पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविकासाठी राज्य शासनाच्या किंवा इतर राज्याच्या/केंद्र शासनाच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा.
(3) या शिष्यवृत्तीसाठी विहीत केलेल्या विद्यापीठ/संस्थांमध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पुर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा. विहीत केलेल्या विद्यापीठ/संस्थांमध्ये प्रवेशित अभ्याक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेला अभ्यासक्रम विहीत कालावधीत पुर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल.

- **उत्पन्नमर्यादा :** (1) या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न ₹८.०० लाखाच्या आत असणे आवश्यक आहे.
(2) विद्यार्थ्यांचे पालक नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म नं.16 व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार) यांनी दिलेले मागील अर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक रहील.
(3) इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार) यांनी दिलेले मागील अर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

- **शैक्षणिक अर्हता :-** (१) या योजनेंतर्गत शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य क्षेत्रातील अन्य परिक्षा मंडळातून इयत्ता १० वी व १२ वी ची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
(२) या योजनेंतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीच्या लाभासाठी विद्यार्थ्यांचे इयत्ता १२ वी च्या परीक्षेतील गुण विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. त्याकरीता विद्यार्थ्यांने इयत्ता १२ वी च्या परीक्षेत किमान ५५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील.
(३) तसेच, पदवी अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या डिप्लोमा धारक विद्यार्थ्यांचे डिप्लोमाच्या परिक्षेतील गुण विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. त्याकरिता विद्यार्थ्याने डिप्लोमाच्या परिक्षेत किमान ५५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहिल.
(४) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्तीकरीता पदवी अभ्यासक्रमातील गुणांची टक्केवारी विचारात घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल. त्याकरीता विद्यार्थ्यांने पदवी परीक्षेमध्ये किमान ५५ टक्के गुण (संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीतील सर्व सत्रांच्या एकूण प्राप्त गुणांची टक्केवारी) मिळविणे आवश्यक राहील. तसेच, CGPA व GPA च्या बाबतीत संबंधित विद्यापीठाचे टक्केवारी रुपांतरण प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.
(५) संबंधित अर्जदार विद्यार्थी हा या योजनेअंतर्गत विहीत केलेल्या संस्थांमध्ये पदवी/पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमांसाठी त्या त्या संस्थांची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रवेशित झालेला असावा.

- **शिष्यवृत्ती अंतर्गत विद्यार्थ्यांना मिळणारे लाभ:-**
(१)शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यास संबंधित विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेने अभ्यासक्रमासाठी ठरवून दिलेले पूर्ण शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक , विकास शुल्क, प्रयोगशाळा

शुल्क इत्यादी शुल्क संबंधित विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेला अदा करण्यासाठी आयुक्त, समाजकल्याण, पुणे संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बैंक खात्यात जमा करतील. संबंधित विद्यार्थ्याने विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेला शुल्क अदा केल्याचे पुरावे आयुक्तालयास सादर करणे आवश्यक राहील.

(२) संबंधित विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेच्या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेने आकारणी केलेले शुल्क तसेच, भोजन शुल्काची सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बैंक खात्यात जमा करण्यात येईल.

(३) जे विद्यार्थी वसतिगृहात जागेअभावी अन्यत्र राहात असतील अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह शुल्क व भोजन शुल्काची रक्कम ही तो शिक्षण घेत असलेल्या संबंधित संस्थेच्या आकारणी करण्यात येत असलेल्या वसतिगृह शुल्क व भोजन शुल्क रक्कमेच्या मर्यादेत सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या अधार संलग्न बैंक खात्यावर जमा करण्यात येईल.

(४) जे विद्यार्थी डे-स्कॉलर म्हणून शिक्षण घेत असतील त्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतील गटानुसार निर्वाह भत्ता सत्रनिहाय रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात येईल.

(५) योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यास अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या पुस्तकांसाठी ₹ ५,०००/- व शैक्षणिक साहित्य तसेच, इतर शैक्षणिक खर्च यासाठी एकूण ५,०००/- अशी एकूण १०,०००/- प्रत्येक वर्षी संबंधित विद्यार्थ्यास त्याच्या आधार संलग्न बँक खात्यावर दोन टप्प्यात अदा करण्यात येईल. यासाठीचा तपशिल आयुक्तालयास सादर करणे बंधनकारक असेल.

➢ **शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची पध्दती :-** (१) या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यास आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

(२) शिष्यवृत्ती अर्जासोबत विद्यार्थ्याने पुढील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे:-

- महाराष्ट्राचा रहिवाशी असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र,
- जातीचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला) तसेच, जात वैधता प्रमाणपत्र,
- फॉर्म नं.१६, उत्पन्नाचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला) व आयकर विवरण पत्र परिच्छेद (इ) (२) व (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे,
- इयत्ता १२ वीचा शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला,
- संस्थेत प्रत्यक्ष प्रवेश मिळाल्याचे संबंधित संस्थेचे पत्र,
- आधार कार्ड, पॅन कार्ड (पालकाचे) व आधार संलग्न बैंक खात्याचा तपशिल.

(३) या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यासाठी संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे स्थानिक व इतर प्रमुख वर्तमान पत्रामध्ये जून जुलै ऑगस्ट महिन्यात जाहिरात देऊन अर्ज प्राप्त करुन घेतील. जाहिरातीनुसार विहित मुदतीत प्राप्त झालेले अर्ज सह आयुक्त (शिक्षण), समाजकल्याण, पुणे यांनी वर नमूद केलेल्या निवड समितीपुढे सादर करावेत. निवड समितीने प्राप्त अर्जामधून निकषानुसार पात्र असलेल्या १०० विद्यार्थ्यांची निवड करावी.

(४) वरील परिच्छेद (ऐ) (१), (२) व (३) नुसार कार्यवाही केल्यानंतरही या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी १०० पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास पुन्हा जाहिरातीद्वारे अर्ज मागवुन १०० विद्यार्थ्यांचा कोटा पुर्ण करण्यात येईल.

(५) आयुक्त, समाजकल्याण, पुणे हे या योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करतील.

(६) या योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्याला भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही. तसेच, विद्यार्थ्याला संबंधित संस्थेत मिळणारे विद्यावेतन, फेलोशिप अन्य कोणतेही लाभ अभ्यासक्रम कालावधीत मिळत असल्यास ते वजा करुन उर्वरित शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

(७) विद्यार्थ्याने शिष्यवृती मिळण्यासाठी चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास तो फौजदारी गन्द्रद्याखाली कारवाईस पात्र ठरेल व त्याला अदा करण्यात आलेली शिष्यवृत्ती महसूली अधिनियमाखाली वसूलपात्र राहील.

(८) अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम संबंधित विद्यार्थी/ पालक/कुटुंबाकडुन वरील अधिनियमाद्वारे वसूल करण्यात येईल.

---